देशोन्नती 07/02/2025

# पोलिस स्थापना दिनानिमित्त नांदेड पोलिस दलांकडुन पोलिस प्रदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन



**नांदेड :** पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त पोलीस मुख्यालय येथे पोलीस दलाच्यावतीने प्रदर्शन भरविण्यात आले असून या प्रदर्शनामध्ये जिल्हा पोलीस दलातील वेगवेगळया विभागाचे स्टॉल लावण्यात आले आहेत. सदरचे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. अनेक शाळा व कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थीनींनी पोलीस मुख्यालय येथे येवुन सदर प्रदर्शन पाहण्याचा लाभ घेतला आहे.

सदर प्रदर्शनात पोलीस विभागाकडुन सायबर सेल, भरोसा सेल, बॉम्बशोधक पथक, शस्त्र विभाग, श्वानपथक व श्वानाचे प्रदर्शन, वाहतूक विभाग, सुरक्षा हेल्पलाईन, वायरलेस यंत्रणा, अंगुलीमुद्रा आदी स्टॉल लावण्यात आले होते. सदर स्टॉलच्या ठिकाणी त्या- त्या विभागाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्याविभागाचे कामकाज कसे चालते याबाबत विद्यार्थी व नागरीकांना सविस्तर माहिती दिली. सदर पोलीस प्रदर्शन पाहण्यासाठी जवळपास दीड ते दोन हजार विद्यार्थी व नागरीकांनी सहभाग नोंदविला आहे. तसेच सदर पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस मुख्यालय येथे पोलीस परेडचे आयोजन करण्यात आले होते. सदर परेडमध्ये २५ पोलीस अधीकारी व १८० अंमलदार यांनी सहभाग घेतला आहे.

तसेच लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पोलीसांना बंदोबस्तामध्ये सहकार्य करणारे एनसीसी कॅडेट, एनएसएस कॅडेट व माजी सैनिक असे एकुण २२८ जणांना अतिशय चांगला बंदोबस्त केल्याने पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमानंतर पोलीस अधीक्षक यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी व नागरीक यांना पोलीस स्थापना दिनानिमित्त मार्गदर्शन केले आहे.

सदर कार्यक्रमाकरीता पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, स्थागुशाचे पो.नि. उदय खंडेराय, राखीव पोलीस निरीक्षक विजय धोंडगे तसेच विविध पोलिस ठाण्याचे , पोलीस मुख्यालयाचे पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग नोंदविला.